





# पारनेर दर्शन







वर्ष १ अंक २१२, रविवार ५ मे २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# लोणीच्या पाहुण्याला घरी पाठवा!

■ प्रभावती घोगरे यांचे आवाहन ■ पोखरी येथील सभेस मोठा प्रतिसाद

पोखरी : प्रतिनिधी

**मतदारांनो जागृत व्हा, पाहुणे-रावळे सांभाळायचे बंद करा. लोणीच्या पाहुण्याला त्याच्या घरी पाठवून देण्याची वेळ आली असल्याचे सांगतानाच लोणीच्या साम्राज्याविरोधात लढणाऱ्या नीलेश लंके यांना विजयी करण्याचे आवाहन कृषीभुषण प्रभावती घोगरे यांनी केले.**

पारनेर तालुक्यातील पोखरी येथे महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेमध्ये घोगरे या बोलत होत्या. यावेळी पोखरी परिसरातील मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

यावेळी बोलताना घोगरे म्हणाल्या, आगोदर तुम्ही राज्य व्यवस्थात चालवा, देशाची चिंता कशाला करता ? घरातच खायला नाही, बाकीच्या लोकांना मात्र काहीच्या काही आश्वासने दिली जातात. राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतमालास मोल कसे मिळेल ? तो स्वयंपुर्ण कसा होईल ? याकडे दुर्लक्ष केले जाते. आज शेतकऱ्यावर जी वाईट वेळ आहे ती कोणावरही नाही. वीज, पाणी, रस्ते या तीन मुलभूत गरजा शेतक-याच्या आहेत. आठ तास वीज मीळते ति देखील रात्रीची. डीपी जळाल्यावर दोन दोन दिवस वीज नसते. यावर उपाय शोधले पाहिजेत. त्यासाठीच आम्ही तुम्हाला निवडूण दिले आहे. आबकी बार चारसो पार, मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी नाही असे घोगरे यांनी ठणकाउन सांगितले.

यावेळी गंगाराम बेलकर, बापूसाहेब शिर्के, अ‍ॅड. राहुल झावरे, अशोक घुले, गोरख आहेर, राजेंद्र चौधरी, प्रकाश गाजरे, बाळू शिंदे, योगेश पवार, रवी गायके, पप्पू गुंड, पोपट गुंड, अजित भाईक, सुवर्णा आहेर, सुरेखा डोंगरे, अभिजित झावरे, अमोल उगले यांच्यासह मोठा जनसमुदाय उपस्थित होता.



■ महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ पोखरी येथे कृषीभुषण प्रभावती घोगरे यांची सभा पार पडली.

## विखे यांनी सहकार अस्तित्वात ठेवला नाही

लोणी खुर्द गावाच्या अनेक जमीनी आहेत, त्यावर सहकारी संस्था उभ्या केल्या आहेत. जुन्या लोकांनी रोजगार उपलब्ध होईल, सभासदांची मुले शिकतील, ग्रामीण भागात शाळा सुरू होतील, वैद्यकिय शिक्षण व सेवा उपलब्ध होईल या अपेक्षेने या संस्था सुरू केल्या. मात्र त्याचा लाभ सभासदांना झाला नाही. विखे यांनी या संस्थावर कब्जा करून कुठेही सहकार अस्तित्वात ठेवला नसल्याचे घोगरे यांनी सांगितले.

## पाहुणा किती दिवस राहू शकतो ?

त्यांचे वास्तव्य शिर्डी मतदारसंघामध्येच असते. तुमचा उपयोग फक्त मतांपुरता केला जाणार आहे. निवडणूकीपुरते तुमच्याकडे येणे राहिल. तुम्हाला विचारले जाईल. त्यानंतर ज्याच्या त्याच्या घरी तो जाईल. पाहुणा किती दिवस राहू शकतो ? दोन दिवस, चार दिवस. त्याला आपल्या घराची ओढ असते. असे सांगत घोगरे यांनी पाहुण्याला घरी पाठविण्याचे आवाहन केले.

## विखेंच्या यंत्रणेला घाबरण्याचे कारण नाही

तुम्हाला वाटत असेल विखे यांची शक्ती मोठी आहे. उमेदवार डॉक्टर आहे, त्यांचे वडील मंत्री आहेत. त्यांची यंत्रणा मोठी आहे असे असले तरी त्याला घाबरण्याचे कारण नाही त्यांची यंत्रणा भाडोत्री आहेत. नीलेश लंके यांच्याकडे जीवाभावाचे सहकारी असून हीच यंत्रणा सर्वश्रेष्ठ आहे असे घोगरे यांनी निक्षून सांगितले.

## विखे यांनी शेतकऱ्यांसाठी काय केले ?

नीलेश लंके मोठया साम्राज्याविरोधात लढा देत आहेत. शरद पवार, बाळासाहेब थोरात यांच्यासारखे धुरंधर नेते आपल्या पाठीशी उभे आहेत. शरद पवारांवर टीका केली म्हणजे तुम्ही महाराष्ट्रात मोठे होत नाहीत. शरद पवारांनी शेतकऱ्यांचे विविध प्रश्न मार्गी लावले. राहुरी कृषी विद्यापीठात संकरीत गाईसाठी मोठे युनिट उभे केले. मांजरी येथे उस संशोधन केंद्र सुरू केले आहे. एमआयटी पार्क उभे केले. विखे यांनी सहकारी संस्था सोडून शेतकऱ्यांसाठी काही केले का असा सवाल घोगरे यांनी केला.

## हुकूमशाही, दडपशाही संपवा

नीलेश लंके शेतकरी कुटूंबातील माणूस एवढया हिमतीने मोठया शक्तीविरूध्द लढा देत आहेत. पारनेरकरांनी त्यांना हिंमत देण्याचे, पाठीशी खंबीर उभे राहण्याचे काम केले पाहिजे. पारनेर तालुक्याला सुवर्णसंधी मिळाली असून नीलेश लंके यांना दिल्लीला पाठवून ही हुकुमशाही, दडपशाही संपविण्याचे आवाहन घोगरे यांनी केले.

## मत कोणाला ते आम्हाला कळते !

राहता तालुक्यातील शिक्षण संस्था, साखर कारखान्याचे कामगार नगर दक्षिण मतदारसंघात आले आहेत. तुमच्याकडे हे लोक येऊन सांगू लागले की विखे यांना मत द्या तर तुम्ही सांगाल की चहा प्या. बस नसेल तर मुक्काम करा. मत कोणाला द्यायचे ते आमचे आम्हाला कळते. यांचे कामगार तुम्हाला येऊन सांगणार. मीडीयाच्या माध्यमातून वास्तव काय आहे हे आपल्याला समजते. त्यांच्या या यंत्रणेचा काही उपयोग होणार नसल्याचे घोगरे म्हणाल्या.

## सामान्यांच्या चरितार्थाशी त्यांना देणे घेणे नाही

विखे हे प्रवरा कारखाना चालवितात, राहुरी कारखाना ते सुस्थितीत आणतील अशी आशा होती मात्र सामान्य जनतेच्या चरितार्थाशी त्यांना काही देणे घेणे नाही. विरोधकास जेरीस आणून त्यास कसे संपवायचे व सत्ता आपल्या ताब्यात कशी ठेवायची ऐव्हडेच यांचे ध्येय आहे असे घोगरे म्हणाल्या.

## लादलेला उमेदवार का स्विकारायचा ?

आम्ही इतर ठिकाणच्या व्यक्तीला का मत द्यायचे ? आमच्याकडे काही पात्रता नाही का ? आमच्याकडे काही ताकद नाही का ? लादलेला उमेदवार तुम्ही का स्विकारायचा ? आपल्या घरात बाहेरचा कुणी कारभारी चालतो का ? पाच दिवसाऐवजी दहा दिवस पाहुणा राहिला तर तुम्हाला चालतो का ? बायकोचा भाउ असला तरी कुरकुर सुरू होते. मग पाहुणा का ठेऊन घ्यायचा ? असे प्रश्न घोगरे यांनी उपस्थित केले.

## दहा वर्षात तुम्ही काय केले ?

अमित शहा यांचे भाषण ऐकण्याचा योग आला. हिंदी, तोडके मोडक्या मोडक्या मराठीतून शरद पवार यांच्यावर टीका त्यांनी केली. पवारांवर टीका करण्यापेक्षा दहा वर्षात त्यांनी काय केले हे सांगितले पाहिजे होते. त्यांनी नोट बंदी केली काय फायदा झाला ? ईडी, सीबीआयचा गैरवापर करून नेते फोडले. हर्षवर्धन पाटील, अर्जुन खोतकर हे काय सांगून भाजपाकडे गेले हे जनता विसरलेली नसल्याचेही घोगरे म्हणाल्या.

# आघाडीचा धर्म पाळा!

■ उध्दव ठाकरे यांचा पारनेरच्या शिवसैनिकांशी संवाद ■ पारनेर येथे शिवसैनिकांचा मेळावा



■ पारनेर तालुका शिवसेनेच्या मेळाव्यात पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी मोबाईलवरून शिवसैनिकांशी संवाद साधला.

पारनेर : प्रतिनिधी

**आताची लढाई माझी तुमची नाही. तुम्हाला सर्वांना माहीती आहे की ही लढाई राज्याच्या अस्मितीची आहे. देशाच्या लोकशाहीसाठीची आहे. कुठेही गडबड करू नका. गोंधळ करू नका. आघाडीचा धर्म पाळून आपल्याला लोकशाहीचे सरकार आणावे लागेल. मी तुम्हाला धन्यवाद देतो. आई जगदंबा तुम्हाला उदंड आयुष्य देवो असे सांगत शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी पारनेरच्या शिवसैनिकांना महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या पाठीशी खंबिरपणे उभे राहण्याचे आवाहन केले.**

शिवसेना उपनेते तथा महाराष्ट्र विधानसभेचे माजी उपाध्यक्ष विजय औटी यांनी भाजपा उमेदवार डॉ. सुजय विखे यांना पाठींबा देण्याचा परस्पर निर्णय घेतल्यानंतर शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी मात्र उध्दव ठाकरे यांचा आदेश शिरोधार्ह मानण्याचा निर्णय घेत सर्व पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परीषदेत तशी भुमीका मांडली. त्यानंतर शनिवारी जिल्हाप्रमुख प्रा. शशिकांत गाडे यांच्या उपस्थितीमध्ये पारनेर शहरातील सेनापती बापट सभागृहात शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिकांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मेळाव्यादरम्यान उध्दव ठाकरे यांनी तालुकाप्रमुख डॉ. श्रीकांत पठारे यांच्याशी संपर्क करून शिवसैनिकांशी संवाद साधला.

या मेळाव्यासंदर्भात बोलताना तालुकाप्रमुख डॉ. श्रीकांत पठारे यांनी सांगितले की, मेळाव्यात विविध शिवसैनिकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्या आदेशानुसार आपला पक्ष महाविकास आघाडीचा घटक पक्ष असल्याने आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या पाठीशी आम्ही उभे राहणार आहोत. येत्या दोन-तीन दिवसांत तालुकास्तरीय मेळाव्याचे आयोजन करण्यात येणार असून या मेळाव्यास पक्षाचे राज्य पातळीवरील ज्येष्ठ नेते उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. या मेळाव्याचे नियोजनही या बैठकीत करण्यात आल्याचे डॉ. श्रीकांत पठारे यांनी सांगितले.

जिल्हाप्रमुख प्रा. शशिकांत गाडे, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख रवी वाकळे, तालुकाप्रमुख डॉ. श्रीकांत पठारे, महिला आघाडी तालुका प्रमुख प्रियंका खिलारी, युवासेना तालुकाप्रुख अनिल शेटे, डॉ. भास्कर शिरोळे, नगरसेवक राजू शेख, बाजार समितीचे संचालक किसन सुपेकर, तालुका संघटक अमोल गजरे यांच्यासह शिवसैनिक मोठया संख्येने उपस्थित होते.

## औटी यांच्यावरील कारवाईबाबात अनभिज्ञ

विजय औटी २० वर्षे शिवसेना चांगल्या पध्दतीने सांभाळली. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी विकास कामेही मार्गी लावली. तालुक्यात चांगल्या पध्दतीचे वातावरण होते. त्यांनी विखे यांना का पाठींबा जाहिर केला ? कशामुळे केला हे माहीती नाही. ते हुशार व्यक्तीमत्व आहे. ते कालही, आजही, उद्याही आमच्यासाठी मार्गदर्शक राहतील. त्यांच्याविषयीचा आदर कमी होणार नाही.औटी यांच्यावरील कारवाईबाबत आम्ही अनभिज्ञ आहोत. पक्षाने आमच्या परस्पर त्यांच्यावर कारवाई केलेली असल्याचे डॉ. श्रीकांत पठारे यांनी सांगितले.

## शिवसैनिकांकडून लंके यांचा प्रचार सुरू

महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या प्रचारात सर्व शिवसैनिक सहभागी झाले आहेत. वाडया वस्त्यांवर शिवसैनिक फिरू लागले आहेत. असे पठारे यांनी सांगितले.

## हॉल अपुरा

विजय औटी यांनी डॉ. विखे यांना पाठींबा देण्याचा परस्पर निर्णय घेतल्यानंतर शिवसैनिकांमध्ये संतापाची ताट होती. त्याचा प्रत्यय या मेळाव्याच्या निमित्ताने आला. शहरातील बापट स्मारकात आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यासाठी मोठया संख्येने शिवसैनिकांनी हजेरी लावल्याने हॉल अपुरा पडला. त्यामुळे बाहेर उभे राहून शिवसैनिकांनी मेळाव्यातील भाषणे ऐकली.

# तुमच्याकडे यंत्रणा, मग रडीचा डाव का खेळता ?

■ अभिषेक कळमकर यांचा सवाल ■ नगरमधील मारहाणीच्या आरोपास प्रत्युत्तर

नगर : प्रतिनिधी

**तुमच्याकडे भरभक्कम यंत्रणा असेल तर असे रडीचे डाव खेळण्याची आवश्यकता नसली पाहिजे. नीलेश लंके यांनी यापूर्वी बऱ्याचदा सांगितले आहे की, निवडणूक निवडणूकीच्या पध्दतीने खेळा. तुमच्या हातून निवडणूक सटतेय हे तुम्ही नगर दक्षिणच्या जनतेला दाखवून देत असल्याचे सांगत नगरचे माजी महापौर अभिषेक कळमकर यांनी डॉ. सुजय विखे यांच्यावर अप्रत्यक्ष टीका केली.**



महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ नगर शहरात प्रभाग ८ मध्ये रॅली तसेच प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीदरम्यान एका महिलेस लंके यांच्या कार्यकर्त्यांकडून मारहाण झाल्याचा आरोप करण्यात आला होता. या आरोपास कळमकर

उर्वरीत पान ३ वर








Shree Datta Bahuuddeshiya Sanstha's

**Saint Vivekanand Public School**

A/P-Jamgaon, Tal-Parner, Dist-Ahmednagar
PH-9860815843, 9420812001

**REQUIRED TEACHERS 2024-2025**

We are looking for passionate experienced /fresher, innovative and qualified teacher with good communication skill and fluency in English for following classes.

| Sr.No. | Subject | Qualification | No.of Post |
|---|---|---|---|
| 1 | Pre-Primary | H.S.C./Graduate/D.Ted | 4 |
| 2 | Primary | H.S.C/Graduate/D.Ted /B.Ed | 3 |
| 3 | Math's | B.sc/M.sc/B.ed | 2 |
| 4 | Science | B.sc/M.sc/B.ed | 2 |
| 5 | STT | B.A./M.A.B.ed/(His/Geo) | 1 |
| 6 | English | B.A./M.A.B.Ed | 3 |
| 7 | Marathi | B.A/M.A.B.Ed | 2 |
| 8 | Hindi | B.A/M.A.B.Ed | 1 |
| 9 | Art Teacher (Drawing) | Diploma ATD | 1 |
| 10 | Administrative Staff | Compuer knowledge | 1 |

Walk-in Interview with all document on Thursday 25 April 2024
10.00 AM to 3.PM at Above Address

Note -

- Salary commensurate based on skill, qualification and Experience.
- Training will be provided to Fresher candidate who are Passionate about Education




स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

# शिवार

# जनावरांतील रिंगणी व्याधी

**तंत्रज्ञानाच्या युगातही शेतीची बरीचशी कामे बैलावर अवलंबून आहेत. आंतरपिकातील मशागत, ज्या ठिकाणी ट्रॅक्टर किंवा इतर वाहने जाऊ शकत नाहीत अशा ठिकाणी माल वाहतूक अशी कामे बैलांच्या साहाय्याने केली जातात. गायी व म्हशीला होणाऱ्या शिंगाचा कर्करोग, डोळ्यांचा कर्करोग, खांद्यावरील ट्युमर, अस्थिभंग, जखमा या व्याधीपैकीच एक म्हणजे रिंगणी. जनावरांमध्ये रिंगणी व्याधी झाल्यास जनावर विकून न टाकता त्यावर वेळीच शस्त्रक्रिया करून उपचार केल्यास जनावरे पूर्ववत कामासाठी वापरता येतात.**



- रिंगणी व्याधी कशी होते? : रिंगणीसाठी पटेला नावाची अस्थी कारणीभूत असते. जनावरांत तीन प्रकारच्या पटेला असतात. त्यातील मेडिअल पटेला ताठर झाल्यास रिंगणी होते. पटेला अस्थी ही सीसमॉईड जातीची अस्थी असून, ती लहान वासरांमध्ये आकाराने खूप लहान असते व वयानुसार ती हळूहळू वाढत जाते आणि विशिष्ट आकार प्राप्त केल्यानंतर त्याची वाढ थांबते. यात सांध्याची हालचाल (मागच्या पायाच्या आतील बाजूस) पटेला अस्थी ताठर झाल्यामुळे जनावराला हालचाल करताना त्रास होतो. त्यामुळे जानावर लंगडत चालते.
- लक्षणे कोणती? : रिंगणीमुळे मागचा एक किंवा दोन्ही पाय बाधीत होतात. मागच्या पायाची सांध्याची हालचाल व्यवस्थित होत नाही. जनावर विश्रांतीनंतर विशेषतः सकाळी लंगडते, पण काही अंतर चालल्यानंतर चाल ही व्यवस्थित होते. पाय ताठर झाल्यामुळे कधी कधी जनावरांचे खुर जमिनीवर घासतात व त्यामुळे काही जनावरांत रक्तस्त्रावसुद्धा होऊ शकतो. बाधित जनावरे जमिनीवर पाय घासतात. जनावरे पायांची हालचाल झटके मारत करतात. अशा जनावरांत चारा खाणे, पाणी पिणे व्यवस्थित असते.
- उपचार पद्धती : जनावरांची वेळीच पशुवैद्यकीय डॉक्टरांकडून तपासणी करून घ्यावी आणि त्यांच्या सल्ल्यानुसार शस्त्रक्रिया करावी. उपचारासाठी वात तोडणे ही शस्त्रक्रिया केली जाते. अगदी काही वेळातच ही शस्त्रक्रिया होते आणि त्यानंतर जनावर व्यवस्थित चालू शकते आणि त्याला सांध्याची हालचाल करता येते. या शस्त्रक्रियेमध्ये मागच्या पायाच्या आतील बाजूस भूल दिली जाते आणि मेडिअल पटेला अस्थी तोडली जाते. शस्त्रक्रियेमुळे दुधाळ किंवा गाभण जनावर व काम करणाऱ्या बैलांत कोणताही विपरित परिणाम होत नाही. शस्त्रक्रियेनंतर जनावरास लगेच चालवले जाते.

### रिंगणी म्हणजे काय?

रिंगणी हे स्थानिक भाषेतील नाव आहे. याला शास्त्रीय भाषेत अपवर्ड फिक्सेशन ऑफ पटेला किंवा स्ट्रींग हॉल्ट असे म्हणतात. रिंगणी हा आजार नसून, व्याधी आहे. ही व्याधी हिवाळ्यात जास्त प्रमाणात दिसून येते.



# काळ चारा टंचाईचा...

## जनावरांच्या काळजीचा!

**पाणी व चाराटंचाईमुळे जनावरांत क्षार व जीवनसत्त्वाचा अभाव दिसून येतो, तर बऱ्याच वेळा जनावरांचा कुपोषणाने मृत्यू होतो. याकरिता पशुपालकाने चाऱ्याची सोय असेल त्या प्रमाणातच उत्पादक जनावरांचे संगोपन करणे गरजेचे आहे. जनावरांमध्ये गरजेनुसार पिण्यासाठी पुरेसे पाणी व चारा मिळत नसल्यास आरोग्याच्या विविध समस्या उद्‌भवतात. तीव्र पाणीटंचाईचा सर्वांत जास्त दुष्परिणाम नवजात वासरे, गाभण जनावरे व दुधाळ जनावरांमध्ये विशेषतः जाणवतो.**

### उपाययोजना काय कराल...

ठरवून दिलेल्या वेळी जनावरांना लसीकरण करून घ्यावे. कारण चाराटंचाईमुळे जनावरांतील रोगप्रतिकारकशक्ती कमी होऊन या काळात रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता जास्त असते. वेळोवेळी गोठ्यातील व जनावरांच्या शरीरावरील बाह्यपरजिवींचे नियंत्रण करावे. शक्य असल्यास शेणतपासणी करून जनावरांच्या शरीरातील जंताचा प्रादुर्भाव कमी करावा. जनावरांच्या आहारात एकदम बदल न करता हळूहळू बदल करावा. जेणेकरून पोटाचे, पचनाचे विकार उद्‌भवणार नाहीत. पशुआहारात कॅल्शियम व फॉस्फरसचा गरजेप्रमाणे पुरवठा होण्यासाठी क्षार मिश्रणाचा योग्य मात्रेत तज्ज्ञांच्या सल्ल्याने समावेश करावा. गोठ्यात जनावरांची जास्त गर्दी न करता व्यवस्थापन करता येईल तेवढ्याच जनावरांचे संगोपन करावे. आजारी जनावरांना तत्काळ वेगळे करून त्यावर उपचार करावेत. प्रकृती पूर्ववत होईपर्यंत इतर जनावरांपासून वेगळे ठेवण्याची सोय करावी. चारा व पाण्याचा काटेकोरपणे वापर करावा. जनावरांना दूरवर चरण्यासाठी फिरवण्याऐवजी एका ठिकाणी ठेवून त्यांना उपलब्ध चारा द्यावा. जेणेकरून विनाकारण फिरण्यामुळे उर्जेचा ऱ्हास होणार नाही, कोणतीही विषबाधा होणार नाही. कमी पाण्यात येणारा हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञानाद्वारे चारा उत्पादन करून जनावरांना चारा द्यावा.

### कुपोषण

जनावरांना वेळेवर व नियमित पुरेसा चारा व पाणी न मिळाल्यामुळे त्यांचे कुपोषण होते, तर बऱ्याच वेळा चरायला सोडल्यानंतर जनावरांना खाण्यास काहीच न मिळाल्यामुळे त्यांची उपासमार होते. खोल गेलेले डोळे व रट त्वचा, आखडलेल्या मांसपेशी ही कुपोषण व उपासमारीची लक्षणे आहेत. कुपोषण व उपासमार टाळण्यासाठी जातिवंत, उत्पादक जनावरांचे चाऱ्याच्या उपलब्धेनुसार संगोपन करावे.



### पशुआहाराशी संबंधित आजार अन् समस्या...

- चयापचयाचे आजार : चयापचयाचे आजार सर्वसाधारणपणे आहारातून कमी ऊर्जेचा पुरवठा झाल्यामुळे उद्‌भवतात. चरायला बाहेर फिरणाऱ्या जनावरांना तर जास्तीच्या ऊर्जेची गरज असते. परंतु, टंचाई काळात ही गरज पूर्ण न होता उलट फिरण्यावर विनाकारण ऊर्जा खर्ची पडते. यामुळे जनावरांचे वजन दिवसेंदिवस घटत जाते. ही स्थिती मुख्यतः गाभण जनावरांमध्ये लवकर आढळते. ही समस्या टाळण्यासाठी आपल्या जनावरांना निकृष्ठ चाऱ्यासोबत योग्य प्रमाणात पशुखाद्य व क्षार मिश्रण द्यावे.
- वनस्पतीपासून व खुरट्या चारा पिकापासून विषबाधा : अपुऱ्या चाऱ्यामुळे जनावरांची पूर्ण भूक भागत नाही. त्यांचे पोट भरत नाही. त्यामुळे जनावरं कोणतीही हिरवी वनस्पती, खुरटी झुडपं चारा समजून खातात. त्यामध्ये असणाऱ्या नायट्राईट, सायनाईड किंवा इतर घटकांमुळे जनावरांना विषबाधा होऊन जनावरं दगावतात. विषबाधेची लक्षणे दिसून आल्यास तत्काळ पशुवैद्यकाकडून उपचार करून घ्यावेत, जेणेकरून जनावरं दगावणार नाहीत.
- आम्लधर्मीय अपचन : खराब वातावरण किंवा खुराकातील धान्याच्या प्रमाणातील बदल यामुळे आम्लधर्मीय अपचनाची समस्या उद्‌भवते. चाऱ्याची उपलब्धता कमी असल्यास किंवा निकृष्ट चारा असल्यास बरेच पशुपालक आपल्याकडील जनावरांना घरातील धान्य भरडून देतात. तसेच खुराकातील घटकांचे, धान्याचे प्रमाण अचानक बदलतात. त्यामुळे आम्लधर्मीय अपचनाची समस्या निर्माण होते. यात पोट गच्च राहणे, हगवण लागणे, रवंथ न करणे, लाथा मारते, चारा न खाणे अशी लक्षणे दिसून येतात. तीव्र स्वरूपाच्या आम्लधर्मीय अपचनात जनावरं दगावण्याची शक्यता असते. या आजारावर पशुतज्ज्ञांच्या सल्ल्याने उपचार करावेत.
- शरीरातील कॅल्शियम अन् फॉस्फरची कमतरता : जनावरांचे संगोपन मुख्यतः वाळलेला चारा, कडबा, शेतातील दुय्यम पदार्थांवर केले जात असेल तर जनावरांना शरीरपोषणासाठी कॅल्शियम, फॉस्फरसचा पुरवठा पुरेशा प्रमाणात व नियमित होत नाही. जनावरांची हाडे ठिसून होऊन कमकुवत होतात. फॉस्फरसच्या कमतरतेमुळे खाल्लेल्या चाऱ्याचे व्यवस्थित पचन न होणे, अखाद्य वस्तू खाणे या समस्या उद्‌भवतात. जनावरांना व्यवस्थित चालता- फिरता येत नाही. गाभण जनावरांना तोंडावाटे कॅल्शियम व फॉस्फरस दिल्यावरही चांगला परिणाम दिसून येतो. जनावरांच्या आहारात क्षार मिश्रणाचा वापर जनावरांच्या शारीरिक स्थितीनुसार करणे फायदेशीर ठरते.
- शरीरातील मॅग्नेशियमची कमतरता : मॅग्नेशियमची कमतरता मुख्यतः थोडा हिरवा चारा व जास्त वाळलेला चारा उपलब्ध असण्याच्या कालावधीत होते. पाण्याच्या कमतरतेच्या काळात ज्या पिकाची मुळे खोलवर विस्तारलेली असतात, ती जमिनीतून पाणी शोषून घेऊन जगण्याचा प्रयत्न करतात. या पिकांमध्ये पोटॅशियमचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे जनावरांच्या पोटात मॅग्नेशियमचे व्यवस्थित शोषण होत नाही. मॅग्नेशियमच्या कमतरतेमुळे फेफरे येणे, चक्कर येणे या समस्या उद्‌भवतात. वेळेवर उपचार न झाल्यास पॅरालिसीस होऊन जनावरांचा मृत्यू होतो. या समस्येमध्ये कॅल्शियम-मॅग्नेशियमयुक्त औषधे पशुतज्ज्ञांच्या सल्ल्याने द्यावीत.



# खरीपात आले लागवड... आतापासून हवे नियोजन

**आले लागवड करताना जमिनीची निवड, पूर्वमशागत, रबियाणे निवड, बीजप्रकिया व पाणी व्यवस्थापन या बाबींचे योग्य शास्त्रीय पूर्वनियोजन केल्यास आले पिकाचे उत्पादन खर्च कमी करून जास्त उत्पादन घेता येते.**

### जमिनीची निवड

पाण्याचा उत्तम निचरा होणारी, हलकी ते मध्यम भारी प्रकारची जमीन असावी. जमिनीचा सामू ६ ते ८ दरम्यान, भुसभुशीत आणि सेंद्रिय कर्बाचे प्रमाण ०.६ ते १ टक्का एवढे असल्यास उत्तम समजावी. पाणथळ, क्षारपड व चोपण जमीन आले पिकासाठी निवडू नये. चुनखडीचे प्रमाण चार टक्क्यांपेक्षा जास्त असणारी जमीन आले पिकासाठी अयोग्य असते. यात आले पिवळे पडून वाढ खुंटते. अशा जमिनीमध्ये सुधारणा करण्यासाठी जुन्या बंधाऱ्यातील गाळ वापरावा. गेल्या ३ ते ४ वर्षांत आले किंवा हळद लागवड न केलेल्या जमिनीची निवड करावी. गेल्या हंगामात हरभरा, सोयाबीन, भुईमूग, कडधान्य यांसारखी द्विदल वर्गीय पिके घेतलेली असल्यास आले पिकाची वाढ जोमदार होते. गेल्या हंगामात ऊस, गहू, ज्वारी, मका यासारखी एकदल वर्गीय पिके घेतलेल्या जमिनीत आले लागवड केल्यास आले पिकाची वाढ मध्यम होते. अशा जमिनीत आले लागवडपूर्व एक ते दीड महिना आधी ताग, धैंचा, चवळी यासारखी हिरवळीचे खतपिके घेऊन गाडून टाकावीत. अथवा सेंद्रिय खतांची मात्रा वाढवावी.

### जमीन तयार करणे...

जमिनीची खोल नांगरट शक्यतो सकाळी करावी. या वेळी पक्ष्यांचे प्रमाण अधिक असून, नांगरटीदरम्यान बाहेर पडणाऱ्या हुमणी व हानिकारक किडींच्या विविध अवस्थांचा ते फडशा पडतात. नांगरटीनंतर १५ दिवस शेत तापू द्यावे. नंतर एकरी १० ट्रेलर चांगले कुजलेले शेणखत वापरून कुळवाच्या उभ्या आडव्या दोन पाळ्या द्याव्यात. पुन्हा शेत २१ ते ३० दिवस उन्हात तापू द्यावे. लागवडीपूर्वी एक आठवडाभर आधी रोटॅव्हेटरने रान भुसभुशीत करून ४ फूट अंतरावर गादीवाफे ट्रॅक्टरच्या साह्याने तयार करावेत. गादीवाफ्याची तळाची रुंदी ४ फूट, माथा रुंदी ३.५ फूट व उंची १ फूट करून घ्यावी. त्यांची लांबी जमिनीच्या उतारानुसार १५० ते २०० फूट ठेवावी. सिंचन ठिबक किंवा सूक्ष्म तुषार पद्धतीने करणे सोपे होते. लागवडीपूर्वीच १ ते २ दिवस आगोदर गादी वाफे किंवा दाताळ्याने एक फूट उंचीचे करून सावरून घ्यावेत. म्हणजे जादा पावसात पाणी साचून कंद कुज होत नाही. तसेच कंद चांगले पोसतात.



### खत व्यवस्थापन

गादीवाफे सावरतानाच एकरी चांगले कुजलेले १ टन सेंद्रियखत किंवा गांडूळखत, २०० किलो निंबोळी पेंड वापरावे. कच्चे शेणखत गादीवाफ्यावर अजिबात वापरू नये. माती परीक्षणानुसार खताचे प्रमाण ठरवावे. हेक्टरी १२०: ७५: ७५ किलो अशी शिफारस असून, खतांची ५० टक्के मात्रा लागवडीवेळी, तर उर्वरित अर्धी मात्रा अडीच ते तीन महिन्यांनी मातीच्या भरणीवेळी द्यावी. नत्राची मात्रा उगवणीनंतर २ ते ३ समान हप्त्यात विभागून द्यावी. माती परीक्षण अहवालानुसार विद्राव्य रासायनिक खताची मात्रा ठिबक सिंचन संचातून द्यावी.

### बियाणे निवड...

केरळ राज्यातील कालिकत येथील भारतीय मसाला पीक संशोधन केंद्राने आले पिकाच्या अधिक उत्पादनक्षम अशा काही जाती विकसित केल्या आहेत. आपल्या भागात चांगली वाढणारी जात निवडवावी...

- ताजे आले विक्रीसाठी : यास माहिम किंवा सातारी, औरंगाबाद, छत्तीसगड, गोध्रा, उदयपुरी या अधिक तंतुमय व चवीला तिखट असणाऱ्या वाणांची लागवड करावी.
- आले प्रकियाची असल्यास : वरदा, सुप्रभा, वायनाड, रिओ - डी-जानेरो, जमैका, मारण या सारख्या कमी तंतुमय व मांसल वाणाची लागवड करावी.
- मागील वर्षी कंदकुज, कंदमाशीचा प्रादुर्भाव न झालेल्या क्षेत्रातील आले वेगळे काढून त्याचा बियाणे म्हणून वापर करावा.
- बियाणे म्हणून आले निवडताना पीक सुप्तावस्थेत असताना म्हणजेच साधारणत: १ मार्च ते ३० एप्रिल दरम्यान पाने पूर्णपणे गळून गेलेली असताना व सुप्तावस्थेनंतर अंकुरण न झालेल्या क्षेत्रामधीलच आले बियाणे म्हणून निवड करावी.

# सध्याचा काळ शेवंती लागवडीसाठी अनुकूल...

**शेवंतीची लागवड करताना संपूर्ण पीक कालावधीतील हवामान परिस्थितीचा विचार करावा. भरपूर व दर्जेदार उत्पादनासाठी योग्य जमिनीत लागवड ही बाबही महत्त्वाची आहे. शेवंतीच्या वाढ व उत्पादनावर तापमान व सूर्यप्रकाश या घटकांचा मोठा परिणाम होतो. सद्यःस्थितीत लागवड केल्यास दसरा, दिवाळी, नाताळ आदी सणांच्या कालावधीत फुलांची उपलब्धता करता येते. परिणामी शेतकऱ्यांना चांगला बाजारभाव मिळतो.**

### अशी हवी जमीन...

शेवंतीची मुळे तंतुमय असतात. जमिनीत खोलवर जात नाहीत. त्यामुळे लागवडीसाठी उत्तम निचऱ्याची जमीन निवडावी. अत्यंत भारी जमिनी पाणी धरून ठेवतात. त्यामुळे शेवंतीला मूळकूज रोग होतो म्हणून लागवडीसाठी मध्यम जमीन (सामू ६.५ ते ७) उपयुक्त ठरते. जमिनीच्या क्षारतेचे प्रमाण ०.२ टक्क्यांपेक्षा कमी व चुनखडीचे प्रमाण ५.८ टक्क्यांपेक्षा कमी असावे. भारी व चोपण जमिनीत तसेच पाणी साठून राहणाऱ्या जमिनीत लागवड करू नये.

### असे हवे हवामान...

शेवंतीच्या वाढीसाठी भरपूर सूर्यप्रकाश व २०-३० अंश सेल्सिअस तापमानाची (मोठा दिवस) आवश्यकता असते. मात्र फुले येण्यासाठी लहान दिवस असलेला काळ लागतो. फुले येतात तेव्हा १० तास सूर्यप्रकाश व १४ तास रात्र आवश्यक (१५ ते २६ अंश सेल्सिअस तापमान) आहे. पिकाला जोराचा पाऊस व धुके मानवत नाही.

### मेमध्ये करावी लागवड

पाणी उपलब्ध असल्यास शेवंतीची लागवड मे महिन्यात करावी. या काळात लागवड केलेल्या पिकास दसरा - दिवाळी दरम्यान फुले येतात. पाण्याची सोय नसेल तर लागवड पाऊस सुरू झाल्यानंतर जून - जुलैमध्ये करावी. या लागवडीस डिसेंबर ते फेब्रुवारी या काळात फुले येतात.



## शॉर्ट न्यूज

### कोपरगावातील पूर्व भागावर पाणी टंचाईचे सावट

■ **कोपरगाव :** गेल्या मान्सून तालुक्यात मध्ये कोपरगाव अत्यंत अल्प किंबहुना पाऊसच न पडल्याने यंदाच्या उन्हाळ्यात सर्वत्र पाण्याचा दुष्काळ मानगुंटीवर बसला असून याची मोठी झळा कोपरगाव तालुक्यातील पूर्व भागाला बसली असून येत्या काळात भीषण पाणी टंचाईचे संकेत निर्माण होण्याची शक्यता या भागातील आजच्या परिस्थितीवरून दिसून येत आहे. तालुक्यातील पूर्व भागासह शहराला मोठ्या प्रमाणात पिण्याच्या पाण्याची टंचाई मे महिन्यात भासू शकते.

### मृणाल फसले हिचा ढोरजळगावात सत्कार

■ **शेवगाव :** मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत ढोरजळगाव-शे प्राथमिक शाळेची दुसरीची विद्यार्थिनी मृणाल ज्ञानेश्वर फसले हिने राज्यस्तरावर ८ वा, तर जिल्ह्यात तिसरा क्रमांक मिळविल्याबद्दल मंथन वेल्फेअर फाउंडेशनतर्फे तिचा स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. राज्य व जिल्हास्तरावरील यशवंत विद्यार्थ्यांचा एफर्ट्स अकॅडमी धनगरवाडी येथे सत्कार समारंभ झाला. यावेळी अभिनेत्री अमृता धोंगडे, सुधीर फाकटकर, रेडिएशन एन्कोलॉजी कन्सल्टंट भूषण निकम, पोलिस उपाधीक्षक आशिष दहातोंडे, ज्येष्ठ साहित्यिक दासू वैद्य आदी उपस्थित होते.

### उत्कर्षा रुपवते यांना मिळतोय प्रतिसाद

■ **शिर्डी :** लोकसभा मतदारसंघ राखीव झाल्यानंतर ही चौथी निवडणूक आहे. गेल्या तीन निवडणुकीत एकाही पक्षाने महिला उमेदवाराला संधी दिलेली नाही. प्रथमच वंचितने उत्कर्षा प्रेमानंद रुपवते यांच्या रुपाने महिलेला उमेदवारी दिली आहे. त्यामुळे शिर्डीत तिरंगी लढत होत आहे. उत्कर्षा रुपवते यांचा मतदारसंघात झंझावाती प्रचार सुरू आहे. मतदारांकडूनही त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. त्यांनी भाऊसाहेब वाकचौरे, खासदार सदाशिव लोखंडे यांच्यासमोर कडवे आव्हान निर्माण केले आहे. त्यांना सर्वच तालुक्यातून जनतेचा मोठा प्रतिसाद मिळत आहे.

### ग्रामसभा ठरावानुसार स्त्री जन्माचे स्वागत

■ **नेवासा :** तालुक्यातील जळके खुर्द येथे झालेल्या ग्रामसभेत स्त्री जन्माचे स्वागत हा उपक्रम सुरू करण्यात आला. पहिली मुलगी जन्माला आलेले माता पिता व त्यांच्या कन्यारत्नांचा सन्मान व स्वागत करून ग्रामपंचायतीच्या वतीने २१०० रुपयांचा धनादेश देऊन सन्मान करण्याचा ठराव मंजूर केला. त्यानुसार दिनेश नारायण वाघमारे यांचा सपत्नीक कन्यारत्नासह सन्मान करण्यात आला तसेच हाशम बाबुलाल शेख यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी सरपंच राजेंद्र बहिरनाथ पंडित, उपसरपंच असिफ पठाण, ग्रामपंचायत सदस्य आदी उपस्थित होते.

### राहाता येथे कराटेची ब्लॅक बेल्ट परीक्षा

■ **राहाता :** कराटे परीक्षा वर्ल्ड जापनीज शातोकॉन कराटे ऑर्गनायझेशन ऑफ इंडिया व व्ही. स्टार मार्शल आर्ट कराटे असोसिएशन ऑफ इंडिया अहमदनगर या संस्थेच्या वतीने शहरातील भन्साळी टॉवर कराटे क्लब हॉल येथे ५ दिवस कॅम्प घेण्यात आला. पाचव्या दिवशी ब्लॅक बेल्ट परीक्षा घेण्यात आली. त्यात १३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता, त्यात ८ मुली व ५ मुलांनी दिली. तसेच परीक्षेचे निरीक्षक म्हणून लातूर येथून पाचवे डॅन ब्लॅक बेल्ट अजमेर शेख, थर्ड डॅन ब्लॅक बेल्ट वसीम शेख, थर्ड ब्लॅक डॅन अनिल सोमवंशी यांनी काम पाहिले.

# पंतप्रधान मोदींचा विकासाचा अश्वमेध कुणी रोखू शकणार नाही

## खा.डॉ. सुजय विखे पाटील यांचा विश्वास



**शेवगाव : प्रतिनिधी**

**देशात पंतप्रधान मोदींचीच हवा असून त्यांच्या विकासाचा विश्वमेध कुणी रोखू शकणार नाही. असे प्रतिपादन महायुतीचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले आहे. त्यांनी सांगितले की, कितीही विरोध केला तरी देशात केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचेच वातावरण आहे आणि जनतेना त्यांच्याच बाजूने कौल देणार असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.**

येत्या ७ मे रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे नगर जिल्ह्यात येणार आहे. त्यांच्या सभेची जय्यत तयारी महायुतीच्या वतीने राष्ट्रवादीचा मेळावा सुरू असताना महायुतीचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी आपल्या प्रचार सभांची गती वाढवली आहे. महायुतीच्यावतीने शेवगांव तालुक्यातील घोटन येथे कार्यकर्ता संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी आमदार चंद्रशेखर घुले याच्यासह, नरोडे काका, अंबादास कळमकर, संजय कोळगे, बबन भुसारी आदी मान्यवरांसह राष्ट्रवादी आणि भाजपाचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी डॉ. विखे यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मागील १० वर्षात देशाचा गतीमान विकास केला आहे. अनेक योजनांच्या मार्फत त्यांनी तळागळातील लोकांचा विकास करून दाखविला असून ३० कोटीहून अधिक लोकांना गरिबीतून मुक्त केले. आर्थिक धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करून भारताची अर्थव्यवस्था पाचव्या स्थानावर आणली आहे. यामुळे देशा परदेशातून अनेक नामांकित कंपन्या भारतात गुंतवणुक करत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आतंरराष्ट्रीय संबंध मजबूत केले. यामुळे आज जगात भारताचा डंका वाजत आहे. येणाऱ्या काळात विकसीत भारताचे स्वप्न त्यांनी देशाला दिले आहे. यामुळे मोदींच्या हमीवर देशातील नागरिकांचा विश्वास असल्याने तिसऱ्यांदा त्यांनाच पंतप्रधान पदावर बसविणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तुमचे प्रत्येक मत हे नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान करण्यासाठी आहे. यामुळे विचारपुर्वक मतदान करा असे आवाहन त्यांनी केले.

आमदार चंद्रशेखर घुले यांनी सुद्धा कार्यकत्यांना संबोधित केले, आ. घुले यांनी सांगितले की, देशाला कणखर नेतृत्व देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशिवाय देशात कुठलाही पर्याय नाही. यामुळे महायुतीचा उमेदवाराला विजयी करणे आवश्यक आहे. खा. डॉ. सुजय विखे ह्यांनी मागील पाच वर्षात आपले कर्तव्य सिद्ध केले आहे. यामुळे नगरच्या विकासासाठी ते पंतप्रधान मोदींच्या टीम मध्ये आवश्यक आहे. यामुळे येत्या १३ मे रोजी कमळाचे बटन दाबून त्यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा असे आवाहन त्यांनी केले.

# २००४ मध्येच बंड करायला हवे होते!

## अजितदादांची मुख्यमंत्रिपदावरून शरद पवारांवर पुन्हा टीका



**इंदापूर : प्रतिनिधी**

**या वयात मी साहेबांना (शरद पवार) सोडायला नको होते अशा चर्चा वारंवार सुरू असतात. परंतु मी त्यांना कधीही सोडलेलं नाही. २००४ मध्ये त्यांनी मला मुख्यमंत्रिपदाची संधी नाकारली. त्याच वेळी मी बंड करायला हवे होते, असे अजित पवार म्हणाले. प्रचार मेळाव्यात त्यांनी सांगितले की, राजकीय कारकीर्दीच्या सुरुवातीपासून ते २०२३ पर्यंत ते म्हणतील ती पूर्व दिशा समजून त्यांचं सगळं ऐकलं. १९६७ मध्ये ते पहिल्यांदा निवडणुकीला उभे राहिले. यशवंतराव चव्हाणांनी त्यांना संधी दिली. पुढे वसंतदादांचे सरकार पाडून पुलोदचं सरकार बनवलं. त्या वेळी यशवंतराव चव्हाणांचं पवारांनी ऐकलं नाही. त्यानंतरही ते सातत्याने भूमिका बदलतच राहिले.**

**तुम्ही केली ती स्ट्रॅटेजी आणि आम्ही केलं ते वाटोळं?**

अजितदादा म्हणाले की, २०१४ ला भाजपला राष्ट्रवादी काँग्रेसने बाहेरून पाठिंबा दिल्याचे सांगण्यात आले. त्याबद्दल विचारले असता ही आपली स्ट्रॅटेजी असल्याचे सांगितले गेले. शरद पवारांनी केली ती स्ट्रॅटेजी आणि आम्ही केलं ती गद्दारी आणि वाटोळं असं कसं?

# सुषमा अंधारेंना घ्यायला आलेलं हेलिकॉप्टर क्रॅश

## सुषमा अंधारे आणि पायलट दोघंही सुखरुप

**महाड : प्रतिनिधी**

**शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांना घ्यायला आलेलं हेलिकॉप्टर क्रॅश झालं आहे. सुषमा अंधारे आणि पायलट दोघंही सुखरुप आहेत. हेलिकॉप्टर का क्रॅश झालं त्याची माहिती समोर आलेली नाही. महाड या ठिकाणी ही घटना घडली आहे.**

**सुषमा अंधारेंनी अपघाताबद्दल काय म्हटलं आहे?**

मी प्रचासभेसाठी जायचं होतं म्हणून थांबले होते. दोन ते तीन सभा करायच्या होत्या आणि मंडणगड तसंच रोहा या ठिकाणी जायचं होतं. त्याआधीच ही घटना घडली आहे. महाडची सभा करून मुक्कामाला थांबले होते. हेलिपॅडजवळ आम्ही होतो. चॉपर येणार होतं. चॉपरने ते दोन ते तीन घिरट्या घातल्या आणि अचानक मोठा आवाज झाला. तसंच धुळीचे लोट उठले. सुरुवातीला नीट काही समजलं नाही. पण आजूबाजूचे सगळे लोक सांगत होते की पुढे जाऊ नका. मला कॅप्टनची चिंता होती की ते सुखरुप आहेत की नाही? मात्र कॅप्टन सुखरुप आहेत. मी आणि माझा लहान भाऊ आम्ही दोघे प्रवास करणार होतो पण आम्ही



सगळे सुखरुप आहोत. प्रवास सुरु करण्याआधीच ही घटना घडली. असं सुषमा अंधारेंनी सांगितलं आहे.

सुषमा अंधारे बारामतीला सुप्रिया सुळेंच्या प्रचारासाठी आयोजित केलेल्या महिला मेळाव्याला चालल्या होत्या. ज्या हेलिकॉप्टरमधून मुंबईत जयंत पाटील उतरले ते हेलिकॉप्टर हेलिकॉप्टर सुषमा अंधारे यांना घ्यायला महाडला गेले. महाडहून हे हेलिकॉप्टर बारामतीला जाणार होते. ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांना घेण्यासाठी आलेलं हेलिकॉप्टर क्रॅश झालं महाडमध्ये झालेल्या या घटनेत सुदैवाने कोणालाही दुखापत झालेली नाही. सुषमा अंधारे आणि पायलट दोघेही सुखरुप आहेत क्रॅश होण्याचं कारण अद्याप अस्पष्ट आहे. क्रॅश होतानाची दृश्यं समोर आली आहेत. या बाबत सुषमा अंधारेंनी नेमकं काय घडलं तेही सांगितलं आहे.


(पान १ वरून)

## तुमच्याकडे यंत्रणा, मग रडीचा डाव का खेळता ?

तसेच शिवसेनेचे शहर प्रमुख संभाजी कदम यांनी पत्रकार परीषदेत उत्तर दिले. कळमकर म्हणाले,या घटनेला राजकीय वळण दिले जात आहे. घटना घडली असेल, त्या महिलेस मारहाण झाली असेल. त्या प्रभागात ज्यावेळी पोलीस चौकशी करतील त्यावेळी सत्य बाहेर येईल.आमच्या विरोधातील जे उमेदवार आहेत. त्यांचे समर्थक घटनास्थळी गोळा होतात. खून, दरोडा अशा घटना घडतात त्यावेळी हे नगरसेवक पाठपुरावा करण्यासाठी का येत नाहीत हा प्रश्न इथे उपस्थित होतो. ज्यावेळी घरातील एका व्यक्तीचा जीव जातो त्याच्या पाठपुराव्यासाठी आपण कधी पुढे येता का ? त्या महिलेस दुखापत झाली असून त्याबाबत महिलेच्या मुलाने प्रतिक्रिया दिली आहे. त्याबाबत पोलीसांनी व्यवस्थित चौकशी करावी. कोणाच्याही दडपणाला बळी नये. गेल्या महिनाभरापासून आम्ही पाहत आहोत. तरूण मुलांना दम दिला जातोय. स्टेटस ठेवले तरी दम दिला जातोय. प्रत्येक गोष्टीकडे राजकीय हेतूने पाहिले जात असल्याचे कळमकर म्हणाले.

शिवसेनेचे शहरप्रमुख संभाजी कदम म्हणाले, असा प्रकार रॅलीतील लोकांकडून घडलेला नाही. रस्त्यावर वाद झाल्याची माहीती समजली. बुऱ्हानगर येथील मयुर कदम या तरूणाच्या कुटूंबातील सदस्य तिथे होते. रस्त्यावर काही घडले असेल. आम्ही समाजकारण करणारे लोक माता भगिनींची इज्जत करणारे लोक आहोत. मान सन्मान देणारे लोक आहोत. रॅलीमध्ये, सभेमध्ये मी स्वतः सहभागी झालो होतो. महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्याकडून ही घटना घडलेली नाही. घडली असेल तर त्या भागातून जाणाऱ्या येणाऱ्या लोकांकडून घडली असेल. त्याचा नीलेश लंके यांच्या निवडणूकीशी, प्रचाराशी काहीही सबंध नाही. काही राजकीय लोकांनी पोलीस ठाण्यात फिर्याद देण्यास भाग पाडले असावे अशी शक्यता आहे. ही व्यक्ती कोणत्या भागात राहते याची चौकशीही करण्यात यावी. चांगल्या वातावरणात निवडणूक सुरू आहे. आरोप प्रत्यारोप होत असतात. चुकीच्या पध्दतीने चुकीच्या बातम्या फिरवून नगर शहराचे वातावरण कोणीही खराब करण्याचा प्रयत्न करू नये असे आवाहन कदम यांनी केले.

ADMISSIONS
OPEN 2024-25
प्रवेश सुरू
२०२४-२५
PARNER PUBLIC SCHOOL
LKG, UKG, STD 1st
State Board
11th Science
(State Board & NCERT Syllabus)
Integrated with NEET & MHT-CET
MHT-CET
(Engg., NATA, Architecture, NDA, Other Entrance)
NEET
(Medical, Agri, Pharmacy, Other Entrance)
G. M. INTERNATIONAL SCHOOL
LKG, UKG, STD 1st to 5th
CBSE Board

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2

डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
● प्रसूती विभाग
- प्रसूती पूर्व तपासणी
- संपूर्ण प्रसूती उपचार
- अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
● गर्भपिशवीचे आजार
- अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
- गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
- गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
● Infertility वंधत्व उपचार
- वारंवार होणारे गर्भपात,
- लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
- पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
- टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

नोंदणी क्र. महा. ३९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच

मेजर भगवान नांगरे सर
* आमची वैशिष्ट्ये *
* १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
* एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
* प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
* मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
* अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
* PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
* पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
* ॲडमिशन ओपन *
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# कुस्त्यांच्या हगाम्याने कुंड यात्रेची सांगता

■ पाच लाखांच्या बक्षिसांची खैरात ■ नामवंत पैलवानांचा सन्मान



निघोज : प्रतिनिधी

**जगप्रसिद्ध रांजणखळगे कुंड परिसरातील यात्रेचा समारोप कुस्त्यांच्या हंगाम्याने झाला असून नगर पुणे जिल्ह्यातील तसेच राज्यातील नामवंत पैलवानांनी हजेरी लावीत उपस्थित कुस्ती शौकीनांना राज्यस्तरीय कुस्ती कशी असते याची झलक व कुस्तीचा खरा आनंद मिळवून दिला. मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट, निघोज ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ तसेच निघोज यात्रा समीती यांनी लोकसहभागातून भरवलेल्या या कुस्ती हगाम्यात नामवंत पैलवान तसेच शिरूर व पारनेर तालुक्यातील छोट्या मोठ्या पैलवानांना पाच लाखांपेक्षा जास्त रुपयांची बक्षीसे दिली आहेत.**

एक हजार रुपयांपासून ते पंचेचाळीस हजारांपर्यंत कुस्त्या या वेळी झाल्या. दुपारी तीन वाजता सुरू झालेल्या कुस्त्या सायंकाळी सात वाजेपर्यंत सुरू होत्या. उपस्थित हजारो कुस्ती शोकीनांनी मळगंगा देवीचा जयजयकार करीत कुस्तीचा मनमुराद आनंद घेतला. पुणे येथील प्रसिद्ध उद्योजक सुधीर वरखडे यांनी वैयक्तिक सर्वाधिक प्रत्येक पैलवानांना बक्षीसे देत कुस्तीचा आनंद घेतला. सरपंच सचिन वराळ पाटील, उपसरपंच माऊली वरखडे, सामाजिक कार्यकर्ते दिलीप ढवण, किशन कन्हैया दूध उद्योग समूहाचे अध्यक्ष शिवाजीराव लंके, जय बजरंग मंडळाचे पदाधिकारी पैलवान अर्जुन लामखडे, पैलवान सुभाष वराळ, पैलवान अमोल लंके, पैलवान नवनाथ लामखडे, पैलवान काशिनाथ वराळ, बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष वसंत कवाद, उपाध्यक्ष नामदेवराव थोरात, वराळ भावकीचे कारभारी भास्करराव वराळ पाटील, ग्रामपंचायत सदस्य मंगेश वराळ, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त रमेश अण्णा ढवळे, निघोज सोसायटीचे माजी चेअरमन बाळासाहेब लामखडे, उपाध्यक्ष शांताराम लाळगे, जी एस महानगर बँकेचे अधिकारी व खंडोबा देवस्थानचे अध्यक्ष पोपटराव लंके, गौतम तनपुरे, शिवव्याख्याते प्रा ज्ञानेश्वर कवाद, जाकीरभाई तांबोळी, उत्तमराव लामखडे, संतोषशेठ रसाळ, पंढरीनाथ उर्फ गोट्या लंके, देवराम लामखडे, जी एस महानगर बँकेचे संचालक बबनराव लंके, मच्छिंद्र लंके, भगवान लामखडे, रमेश वरखडे, सक्षम प्रतिष्ठानचे अध्यक्ष व मुंबई येथील व्यवसायीक निलेश वराळ, खंडू घुले, जयसिंग हरेल, सुरेश ढवण, पत्रकार संदीप ईधाटे, बाबाजी वाघमारे, भास्करराव कवाद, संतोष ढवण, बाबाजी लंके, माजी चेअरमन भाऊसाहेब लामखडे, संतोष वराळ, संतोष शेटे , आपला गणपती समाजसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष रवि रणसिंग, स्वप्नील वराळ आदी निघोज ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ आदिंनी उत्कृष्ट नियोजन करीत कुस्तीचा आखाड्याला शोभा आणली.

गेली दोन दिवस सुरू असलेल्या कुंडयात्रेसाठी लाखो भावीक उपस्थित होते. ही यात्रा खेळणी साहित्य,शेतीचे औजारे व साहित्य, घरगुती साहित्य, मिठाई यासाठी प्रसिद्ध आहे. या माध्यमातून दोन दिवसांत लाखो रुपयांची उलाढाल झाली आहे सर्वाधिक खरेदी महिला भगिनी करीत असतात यावेळी मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. तसेच फटाक्यांची आतषबाजी करण्यासाठी पन्नास हजार रुपये खर्च करण्यात आला होता. दोन दिवस एस टी बस पारनेर आगाराने निघोज ते कुंड चार किलोमीटर प्रवासासाठी स्पेशल बसेसची व्यवस्था करण्यात आली होती. विज मंडळाने चोवीस तास विजेची व्यवस्था केली होती प्राथमिक आरोग्य केंद्राने यात्रेकरूंना आरोग्य सेवेसाठी उपाययोजना केली होती. गेली चार दिवसांपूर्वी पाटबंधारे नारायणगाव विभागाने कुकडीला पाणी सोडल्याने भाविकांची चांगली व्यवस्था झाली होती. मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट, ग्रुप ग्रामपंचायत निघोज व ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ यांनी तसेच सेवाभावी संस्था यांनी उत्कृष्ट नियोजन करीत यात्रेकरूंना व भाविकांना आनंद मिळवून दिला. यावेळी शिरूर व पारनेर तालुक्यातील मान्यवर व पाहुणे यांचा सत्कार गावकरी व मुंबईकर मंडळ यात्रा उत्सव समिती यांच्या वतीने करण्यात आला.

### कुस्ती आखाड्यासाठी स्टेडिअम

**जगप्रसिद्ध रांजणखळगे कुंड परिसरात कुस्ती आखाड्यासाठी भव्य स्टेडियम उभे केले असून सध्या दोन हजार लोक बसतील अशी व्यवस्था असून किमान दहा हजार लोकांना कुस्ती पाहाता येईल असे नियोजन करण्यात येणार असून प्रत्येक वर्षी गावकरी व मुंबईकर मंडळ हजारो रुपये देणगी देऊन या नियोजित स्टेडियमसाठी योगदान देत असतात. शुक्रवारी झालेल्या या आखाड्यात सुद्धा मुंबईकर मंडळ व गावकरी यांनी स्टेडियमसाठी किमान एक लाख रुपये पेक्षा जास्त देणगी दिली असून लवकरच हे भव्य स्टेडियम उभे राहील असा विश्वास देणगीदार व्यक्त करीत आहेत.**

### पुढील वर्षी मोठे नियोजन

**कुस्तीचा आखाडा नंबर एकच होण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न केले गावकरी व पाहुणे मंडळी यांनी फार मोठे योगदान दिले म्हणून पाच लाख रुपयांची बक्षीसे देत नामवंत पैलवान तसेच छोटी मोठी पैलवान यांचा सन्मान करण्यात आला. पुढील वर्षी फार मोठे नियोजन असून जगप्रसिद्ध रांजणखळगे कुंड परिसरातील यात्रे निमित्ताने राज्यस्तरीय कुस्ती हगामा होणार आहे.**

**शिवाजीराव लंके**
**अध्यक्ष मळगंगा यात्रा उत्सव समिती निघोज**

# पथनाट्यातून मतदार जागृती अभियान

आडवाटेचं पारनेर व पारनेर तालुका पत्रकार संघाचा उपक्रम

पारनेर : प्रतिनिधी

**मतदार राजा जागा हो, लोकशाही चा धागा हो असा संदेश देत आडवाटेच पारनेर व पारनेर तालुका पत्रकार संघाचे वतीने ठिकठिकाणी मतदान जनजागृती अभियान पथनाट्यातुन राबविण्यात आले.**



लोकसभेची निवडणूक सुरू झाले नंतर आडवाटेच पारनेर व पारनेर तालुका पत्रकार संघाचे वतीने पथनाट्य बसवण्यात आले. बुधवारी सकाळी प्रा.तुषार ठुबे, अशोक गायकवाड, संकेत ठाणगे, यांच्या मार्गदर्शनाखाली बालकलाकार सोहम ठुबे, समरण काळे, भार्गवी शिरोळे, , कृष्णा औटी, वेदराज मुळे, उदयन गट, समीक्षा गट, साई वैद्य,वेदांत मुळे,कार्तिक थोरात, स्पंदन भोर,योगेश लोंढे यांनी मतदार राजा जागा हो लोकशाहीचा धागा हो हा संदेश देत पथनाट्य सादर केले. पारनेर शहरातील मुख्यवेशी समोर व नंतर पारनेर बसस्थानक परिसरात पथनाट्यातुन जनजागृती करण्यात आली.

माजी सभापती काशिनाथ दाते,नगराध्यक्ष नितीन अडसूळ, मुख्याधिकारी विनय शिपाई, पाणीपुरवठा सभापती योगेश मते,नगरसेवक अशोक चेडे, अर्जुन भालेकर, डॉ.बाळासाहेब कावरे, युवराज पठारे, भुषण शेलार, दत्तात्रय अंबुले, बाळासाहेब नगरे, शंकर नगरे,कुंडलिक पठारे, सखाराम औटी,,रा.या.औटी, डॉ. संदीप औटी, पारनेर तालुका पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय वाघमारे, तालुकाध्यक्ष उदय शेरकर, सामाजिक उपक्रम प्रमुख विनोद गोळे, सुरेंद्र शिंदे, संतोष सोबले, श्रीकांत चौरे, चंद्रकांत कावरे, सचिन नगरे, मच्छिंद्र मते उपस्थित होते.

**पारनेर तालुका पत्रकार संघाचे वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी प्रयत्न करीत आहे. त्यामुळे आडवाटेच पारनेर व पारनेर तालुका पत्रकार संघाने मतदार जागृती अभियान माध्यमातून मतदान हे राष्ट्रीय कर्तव्य आहे हे पथनाट्यातून सांगितले.**

**प्रा.तुषार ठुबे**
**प्रमुख,आडवाटेचं पारनेर**

# वासुंदेचा राजवर्धन सैद प्रज्ञाशोध परीक्षेत राज्यात आठवा

स्थानिक स्कूल कमिटीने केला सन्मान

वासुंदे : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील वासुंदे येथील राजवर्धन सैंद प्रज्ञाशोध परिक्षेत राज्यात ८ वा तर जिल्हात तिसरा क्रमांक मिळवुन बाजी मारली आहे. वासुंदे येथील शिक्री येथील हा विद्यार्थी असून त्याच्या या यशाबद्दल स्थानिक स्कूल कमिटीने सन्मान केला आहे.**

मंथन राज्यस्तरीय परीक्षा २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दुसरीतील राजवर्धन सचिन सैद राज्यात ८ वा क्रमांक आणि जिल्ह्यात ३ रा क्रमांक पटकवला आहे. २८ एप्रिल रोजी सुधीर फाकटकर, डॉ. भूषण निकम, दासू वैद्य, आशिष दहातोंडे, वैभव पडवळ, अभिनेत्री आमृता धोंगडे, महेश देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत पारितोषिक वितरण सोहळा पार पडला. या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक राजेंद्र दाते, नवले मॅडम, आई वडील आजोबा सरपंच भाऊसाहेब सैद, सुमन सैद आणि काका पीएसआय विजय सैद यांचे मार्गदर्शन लाभले.



यशाबद्दल अहमदनगर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील, गुरुदत्त मल्टिस्टेट पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष बा.ठ. झावरे, जोगेश्वरी पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन जालिंदर वाबळे, उपसरपंच शंकर बर्वे, वासुंदे सेवा सोसायटीचे चेअरमन नारायण झावरे, उद्योजक अशोक खराबी, कॉन्ट्रॅक्टर संतोष दाते, इंजि. निकील दाते, देवकृपा पतसंस्थेचे कार्यकारी संचालक अशोक पाटोळे यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

# डी.फार्म मेगा जॉब फेअरला सीताबाई थिटे कॉलेजचा उत्स्फूर्त प्रतिसाद



शिरूर : प्रतिनिधी

**डी.फार्मसी क्षेत्रात करिअर करु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना एका छताखाली विविध औषध निर्माण कंपन्यांना एकत्र आणून नॅशनल फार्मसी वेल्फेअर असोसिएशन यांनी प्रथमच आयोजित केलेल्या डी.फार्म मेगा जॉब फेअरला राज्यातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.**

यावेळी शिरूर येथील सीताबाई थिटे कॉलेज ऑफ फार्मसीचा सहभाग नोंदवला होता. यामधील आठ विद्यार्थ्यांना त्वरित फार्मसी कंपनीत फार्मासिस्टपदी निवड झाली. यामध्ये पुणे शहर आणि जिल्ह्यातील ४६ पदविका औषध निर्माण शास्त्र महाविद्यालये आणि २५ फार्मास्युटीकल कंपन्यांनी सहभाग नोंदवला. पुणे कर्वेनगर येथील महालक्ष्मी लॉन्स येथे जॉब फेअर यशस्वीरित्या पार पडला. राज्यातून दोन हजार विद्यार्थ्यांनी जॉब फेअर मध्ये आपली नाव नोंदणी केली होती. तसेच स्पॉट रजिस्ट्रेशन करूनही विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले.

यावेळी फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाचे मान्यता समिती सल्लागार डॉ.नरेंद्र गोवेकर, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास व रोजगार पुणे विभागाच्या उपायुक्त अनुपमा पवार, तंत्रशिक्षण संचालनायाच्या पुणे विभागीय कार्यालयाचे सहाय्यक संचालक मारुती जाधव, महाराष्ट्र फार्मसी कौन्सिल चे अध्यक्ष अतुल अहिरे उपस्थित होते. मान्यवरांनी अशा प्रकारचा जॉब फेअर घेऊन डिप्लोमा फार्मसी क्षेत्रातील विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध करून देण्याचा एक अत्यंत स्तुत्य उपक्रम राबविल्याबद्दल आयोजकांचे कौतुक आणि आभार मानले.

सीताबाई थिटे कॉलेज ऑफ फार्मसी मधील तब्बल २८ विद्यार्थ्यांनी यामध्ये नाव नोंदणी केली होती तर एकूण आठ विद्यार्थ्यांची ऑप्टिवल हेल्थ सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड कंपनी मध्ये फार्मासिस्ट पदासाठी निवड करण्यात आली.
डी फार्म मेगा जॉब फेअर यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी पी.ए.जाधव, डॉक्टर वी.एन. जगताप, डॉ. आर वी.शेटे, डॉ. अमोल शाह, डॉ.सचिन कोतवाल, प्रा. प्रवीण जावळे, प्रा. प्रशांत हंबर, डॉ.प्रवीण साबळे, डॉ. जी.एम. स्वामी, प्रा. एन. ए पाटील प्रा. सुजित करपे अशा प्राचार्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिरुद्ध दडके आणि प्राध्यापक प्रियांका बोरुडे यांनी केले. आभार प्राचार्य डॉ. सचिन कोतवाल यांनी मानले.

# निरोगी व निर्व्यसनी तरुणाईसाठी क्रीडांगणाची नितांत गरज

निवडणूक निरीक्षक अरविंदन यांचे मत

हिवरे बाजार : प्रतिनिधी

**निरोगी व निर्व्यसनी तरूणाईसाठी क्रीडांगणाची नितांत गरज असल्याचे प्रतिपादन नगर दक्षिण मतदार संघाचे निवडणूक निरीक्षक अरविंदन यांनी व्यक्त केले.**

श्री.अरविंदन यांनी नुकतीच बाजारला भेट दिली. यावेळी ते बोलत होते.पद्मश्री पोपटराव पवार यांनी विविध विकास कामांची माहिती दिली.

याप्रसंगी बोलताना ते पुढे म्हणाले,सध्याच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात सोशल मिडीयाचा वापर दिवसेंदिवस वाढत चाललेला असून त्याचा वापर विधायक कामांसाठी करावा.तरूणाईला योग्य दिशा देण्यासाठी आणि निरोगी व निर्व्यसनी पिढी तयार होण्यासाठी तरूणाईची उर्जा खेळामध्ये खर्च होण्याची गरज आहे.
आदर्श गाव हिवरे बाजार येथील ग्रामदैवत श्री. क्षेत्र मुंबादेवी यात्रा उत्सवानिमिताने कुस्त्यांच्या भव्य आखाड्याचा शुभारंभ त्यांचे शुभहस्ते करण्यात आला.हिवरे बाजार हे अतिशय कमी पाऊस पडणारे गाव असूनसुध्दा पद्मश्री पोपटराव पवार यांच्या निस्वार्थी नेतृत्वाखाली ग्रामस्थांचा लोकसहभाग व शासकीय योजना यांच्या समन्वयातून अतिशय दर्जेदार असे पाणलोट क्षेत्र विकासाचे काम केलेले आहे.



हिवरे बाजारला गेल्या कित्येक वर्षांची कुस्तीची मोठी परपंरा असून कुस्त्यांसाठी पैलवानाची संख्या मोठी होती आणि सर्व कुस्त्या चितपट झाल्या.याप्रसंगी प्रल्हाद गीते सहा.पोलीस निरीक्षक नगर तालुका पोलीस स्टेशन,छबुराव ठाणगे चेअरमन वि.का.से.सो.,रामभाऊ चत्तर व्हा चेअरमन वि.का.से.सो,बाबासाहेब गुंजाळ चेअरमन मुंबादेवी सहकारी दुध उत्पादक संस्था, हरिभाऊ ठाणगे(सर), रोहिदास पादीर ग्रा.प.सदस्य, एस.टी.पादीर सर, अर्जुन पवार,दामोधर ठाणगे आणि गावातील व परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# येणाऱ्या सर्वच निवडणुकांसाठी एकत्र

मंत्री विखे पाटील आणि आ. शिंदेची ग्वाही

जामखेड : प्रतिनिधी

**माझ्या आणि आ.राम शिंदे यांच्या मध्ये आता कोणतेही मतभेद राहीलेले नसुन यापुढील सर्व निवडणूका आम्ही एकत्रित येवून एक विचाराने लढविणार आहोत,'' अशी ग्वाही राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पा. व माजी मंत्री आ.प्रा.राम शिंदे यांनी आज जामखेड शहरातील चुंभळी येथील जाहीर सभेत दिली.**



लोकसभा निवडणूक प्रचाराच्या निमित्ताने शहरातील जामवाडी, तपनेश्वर, मुख्य बाजारपेठ, शिवाजी नगर, संताजी नगर, सदाफुले वस्ती, आरोळे वस्ती आणि चुंभळी येथे नागरीकांच्या भेटी घेवून संवाद साधला. केंद्र आणि राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयांची माहीती देवून महायुतीच्या उमेदवाराला खंबीरपणे साथ देण्याचे आवाहन त्यांनी केले. माजी मंत्री आ.राम शिंदे, शिवसेना नेते बाबुशेठ टायरवाले, भाजपा नेते विनायकराव देशमुख यांच्यासह स्थानिक पदाधिकारी याप्रसंगी उपस्थित होते.

चुंभळी येथील कार्यक्रम सुरु होताच, उपस्थितांनी आ.राम शिंदे यांच्यावर होत असलेल्या अन्यायाचा प्रश्न उपस्थित केला. आ.शिंदे यांनीच या चर्चेत हस्तक्षेप करुन,'' मंत्री विखे पाटील आणि माझ्यामध्ये आता कोणतेही मतभेद राहीलेले नाहीत. आपल्याला आता महायुतीच्याच उमेदवाराचे काम करायचे आहे. या भागातून शंभर टक्के मतदान हे महायुतीच्या उमेदवारालाच होईल, असे काम करायचे आहे .'' असे सांगून त्यांनी हा विषय संपविला. याच विषयाचा उल्लेख करुन, मंत्री ना. विखे पाटील यांनीही चुंभळी येथील श्री.मस्कोबा महाराजांच्या देवस्थानाचा उल्लेख करुन, आमच्या लोणी बुद्रूक गावाचे ग्रामदैवत सुध्दा म्हसोबा महाराज आहेत. या देवस्थानांच्या साक्षीने सांगतो की, ''आमच्या दोघांमध्ये आता कोणतेही मतभेद नाहीत. यापुढील सर्व निवडणूका आम्ही एकत्रितपणेच लढविणार आहोत. याबाबत कुणीही मनात संभ्रम ठेवु नये.''

# सुप्यात पोलिसांचे सशस्त्र संचलन

निवडणूकीत अनुचित प्रकार रोखण्यासाठी उपाययोजना



सुपा : प्रतिनिधी

**आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुपा पोलिसांनी सुपा शहरातुन सशस्त्र संचलन केले. येत्या १३ मे रोजी अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदार संघात मतदान होत आहे. मतदानाला अवघे आठ ते नऊ दिवस शिल्लक राहिले आहे. निवडणूक काळात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये जनतेच्या मनात कुठल्याही प्रकारची भिती राहू नये मतदारांना निर्भिड व निपक्ष मतदान करता यावे या उद्देशाने सुपा पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक अरुण आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली सुपा पोलिसांनी सुपा शहरातुन गुरुवारी सशस्त्र संचलन केले.**

यावेळी पोलिसांनी विविध प्रकारचे शस्त्रे,आश्रुधुराच्या नळकांड्या,पोलिस वाहने, रुग्णवाहिका अशा सर्व ताफा या रुट मार्चमध्ये सहभागी केला होता. सुपा पोलिसांनी सुपा बसस्थानक चौकात एकत्र येत शस्त्रे व शिस्तबद्ध पद्धतीने रुट मार्चला सुरुवात केली सुरवातीला पुढे वरिष्ठ पोलिस अधिकारी त्यानंतर विविध शस्त्रधारी पोलिस त्यानंतर पोलिस वाहने रुग्णवाहिका अशा पद्धतीने रुट मार्चला सुरुवात झाली. रुटमार्च सुपा बस स्थानक चौकातून सुरु होऊन पारनेर रोड, बाजारतळ चौक,विद्यालय रोड, जुने ग्रामपंचायत कार्यालय, दत्त मंदिर पुढे अहमदनगर पुणे महामार्ग या रस्त्याने रुट मार्चचे संचलन झाले.

यावेळी पोलीस निरीक्षक आव्हाड यांनी उपस्थित पोलिसांना मार्गदर्शन केले व संकट काळी परिस्थिती कशी हाताळावी याविषयी सुचना केल्या.निवडणूक काळात कुठलाच अनुचित प्रकार घडू नये यासाठी सुपा पोलिसांकडून मोठी खबरदारी घेतली जात आहे. पोलिसांनी अगोदरच परवानाधारक व्यक्तींची शस्त्रे जमा करून घेतली आहेत व गुरुवारी सुपा शहरातुन शसस्त्र संचलन करत रुट मार्च काढला गुन्हेगारांवर पोलिसांचा वचक राहवा निवडणूक काळात कोणीही दहशत पसरवू नये मतदारांना मोकळ्या वातावरणात निपक्ष व निर्भिडपणे मतदान करता यावे यासाठी हा रुट मार्च काढला असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# पारनेर तालुक्याला खा.सुजय विखेंनी न्याय दिला - जि.प. माजी अध्यक्षा शालिनीताई विखे

निघोज : प्रतिनिधी

**खासदार डॉ.सुजय विखे पाटील यांनी लोकसभा मतदारसंघात मोठ्या प्रमाणात विकासकामे केली आहेत तसेच पारनेर तालुक्यात विकासकामे करताना सुद्धा तालुक्याला न्याय देण्याची भूमिका त्यांनी घेतली असल्याने पारनेर तालुक्यात खासदार डॉ सुजय विखे पाटील यांना सर्वाधिक मताधिक्य मिळणार असल्याची ग्वाही जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांनी दिली आहे.**



निघोज व अळकुटी येथील दौऱ्यात त्यांनी महिला मंडळांशी चर्चा करीत डॉ विखे पाटील यांना निवडून आणण्यासाठी कार्यकर्ते व महिला भगिनी यांनी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले. यावेळी जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या सुप्रियाताई झावरे, भाजपच्या महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा अश्विनी थोरात,सुश्मिता विखे, मोनिका सावंत, सुवर्णा विखे पाटील, सरपंच चित्राताई वराळ पाटील, ग्रामपंचायत सदस्या रुपाली गायखे, कमलाबाई पवार, जवळा ग्रामपंचायत सदस्या सोनाली सालके, ग्रामपंचायतीच्या माजी सदस्या, सुमन कवाद, उषा आतकर, तृप्ती वराळ, शितल पोपळघट, वैष्णवी पोपळघट, दिक्षा पोपळघट, ग्रामपंचायत सदस्या शबनूर इनामदार, मळगंगा महिला बचत गटाच्या अध्यक्षा सोनीताई पवार, तेजस्विनी महिला बचत गटाच्या अध्यक्षा सविता गायखे, मंगल शेजवळ, रुपाली शेजवळ, शाकुबाई वरखडे, अंजना वराळ, लक्ष्मी चव्हाण, पंचायत समितीचे माजी सदस्य दिनेश बाबर, विखे पाटील युवामंचचे तालुका प्रवक्ते प्रतिक वरखडे, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष अस्लमभाई इनामदार उपस्थित होते.

विखे ताई यावेळी म्हणाल्या गेली पाच वर्षात जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या माध्यमातून निघोज - अळकुटी जिल्हा परिषद गटात सर्वाधिक विकासकामे झाली आहेत. ही विकासकामे करताना संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी सातत्याने विकासकामांचा पाठपुरावा केला आहे. खासदार डॉ विखे पाटील हे एक सुसंस्कृत नेतृत्व आहे. पारनेर नगर विधानसभा मतदारसंघात सध्या काय परस्थीती आहे याची जाणीव जनतेला आहे. राजकारण हे समाजकारणावर आधारीत असते मात्र समाजकारण करताना गुंडागर्दी चालत नाही. फक्त सोशल मीडियाच्या माध्यमातून अवास्तव प्रसिद्धी मिळवायची आणि याचा फायदा राजकारणात करुन घ्यायचा हे दिवस संपले आहेत. पारनेर तालुक्यातील जनता सुज्ञ आहे हा तालुका विचारवंतांचा तालुका आहे.

विखे पाटील यांनी पन्नास वर्षात काय केले याची जाण जनतेला पुर्णपणे आहे. पारनेर तालुका हा शैक्षणिक दृष्ट्या राज्यात नावलौकिक मिळविलेला तालुका आहे लोकसभा निवडणुकीत कोण उमेदवार कसा आहे याचे मुल्यमापन तालुक्यात होणार असून विखे पाटील हेच विक्रमी मताधिक्याने विजयी होतील अशी खात्री विखे यांनी व्यक्त केली.

सरपंच चित्राताई वराळ पाटील यावेळी म्हणाल्या खासदार डॉ.सुजय विखे पाटील यांनी पारनेर तालुक्यात खासदारकीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकासकामे केली आहेत. एक सुसंस्कृत नेतृत्व म्हणून ते राज्यात परिचीत आहेत.

लोकसभा निवडणूक ही आठ विधानसभा मतदारसंघात होत आहे याची जाण विरोधकांनी ठेवणे आवश्यक आहे. फक्त सोशल मीडियावर मेसेज टाकले म्हणजे प्रचार झाला हा विरोधकाचा गैरसमज आहे. खासदार डॉ सुजय विखे पाटील यांना दक्षिण लोकसभा मतदारसंघातील सर्व विधानसभा मतदारसंघात मोठ्या प्रमाणात पाठींबा मिळत आहे. कार्यकर्त्यांची संख्या हजारो आहे. विखे पाटील यांचे नेटवर्क तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जे सर्वसामान्य जनतेसाठी योजना दिल्या आहेत त्यामुळे गरीबांचा विकास मोठ्या प्रमाणात झाला आहे म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्याचा मनोदय सर्वसामान्य जनतेने व्यक्त केला आहे. निघोज - अळकुटी जिल्हा परिषद गटात सर्वाधिक मताधिक्य खासदार डॉ विखे पाटील यांनाच मिळणार असून खासदार डॉ विखे पाटील हे विक्रमी मताधिक्याने विजयी होतील अशी खात्री सरपंच चित्राताई वराळ पाटील यांनी व्यक्त केली आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com